**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**गुरुवार दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **डिजिटल संपर्कामुळे शिक्षण, आरोग्य आणि शासकीय सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहचल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **दुष्काळ जाहीर झालेल्या सर्व तालुक्यांमध्ये मागणी करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला मोफत अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याचे राज्य शासनाचे निर्देश.**
3. **प्रारुप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांसाठी येत्या शनिवार आणि रविवारी मतदान केंद्रांवर विशेष मतदार नोंदणी शिबिरांचं आयोजन.**
4. **ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर सायंकाळी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार.**
5. **कॅनेडियन लेखिका ॲन कार्सन यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार जाहीर.**

---

'इंडिया मोबाइल काँग्रेस'

डिजिटल कनेक्टिव्हिटीनेमुळे शिक्षण, आरोग्य आणि शासकीय सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहचल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत 'यशोभूमी' इथं १० व्या IMC, अर्थात 'इंडिया मोबाइल काँग्रेस' चं उदघाटन करताना बोलत होते. 'स्केल विदाऊट बाउंडरीज' ही IMC 2026 ची संकल्पना आहे. दूरसंचार, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि तंत्रज्ञान विषयक नवोन्मेष या क्षेत्रांमधली भारताची उल्लेखनीय प्रगती प्रदर्शित करण्याच्या उद्देशानं हा चार दिवसांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात आज ५जी कनेक्टिव्हिटी पोहोचली असून, दुर्गम खेड्यातल्या सर्वसामान्य जनतेला दर्जेदार माहिती सहज उपलब्ध होत असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

---

मोफत धान्य

दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये मागणी करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला मोफत अन्नधान्य उपलब्ध करुन द्यायचे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचे लाभार्थी नसलेल्यांना सुद्धा मोफत अन्नधान्य मिळेल.

त्यांना अंत्योदय अन्न योजना किंवा प्राधान्य कुटुंबात समाविष्ट करुन, कुटुंबातल्या सर्व सदस्यांची आधार जोडणी पूर्ण करुन तात्काळ अन्नधान्य उपलब्ध करुन द्यायचे आदेश अन्न आणि नागरी पुरवठा विभागानं आज जारी केले. रेशन कार्ड असलेल्या परंतु स्थलांतर केलेल्या कुटुंबांना जवळच्या रेशन दुकानातल्या ई-पॉस यंत्राद्वारे अन्नधान्य द्यायचे आदेश सरकारनं दिले.

-------------------------------------

मतदार शिबीर

SIR दरम्यान प्रारुप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांसाठी निवडणूक आयोग येत्या शनिवार आणि रविवारी मतदान केंद्रांवर विशेष मतदार नोंदणी शिबिर आयोजित करणार आहे. याशिवाय १२ ऑक्टोबरपूर्वी मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि BLO कडेही अर्ज सादर करता येतील. याशिवाय voters.eci.gov.in या वेबसाइटवर किंवा ECINET ॲपवरही मतदार अर्ज भरू शकतात. तसंच युवा मतदारांची मोठ्या संख्येनं नोंदणी व्हावी, यासाठी राज्यातली सर्व महाविद्यालयं आणि विद्यापीठांमध्ये विशेष मतदार नोंदणी शिबिरं आयोजित करण्यात आली आहेत.

-------------------------------------

सेवा संकल्प-अटल इनोव्हशन मिशन-2016

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला आज २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७ च्या दिशेनं होत आहे. या अंतर्गत विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत अटल इनोव्हेशन मिशन बद्दल.....

***(व्हॉइस कास्ट - धैर्यशील)***

***देशात नवोन्मेषाची व्याप्ती वाढवण्याच्या उद्देशाने 2016 मध्ये नीती आयोगाच्या अंतर्गत अटल इनोव्हेशन मिशनची स्थापना करण्यात आली. त्यावेळी संशोधन आणि स्टार्टअप्सची बहुतांश कामगिरी काही मोजक्या संस्था आणि महानगरांपुरतीच मर्यादित होती. त्यामुळे इतर भागांतील शालेय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वैज्ञानिक प्रयोग आणि तंत्रज्ञानाचा अनुभव घेण्याच्या संधी कमी होत्या. या पार्श्वभूमीवर मिशनअंतर्गत दोन स्तरांवर काम करण्यात आलं. अटल टिंकरिंग लॅबच्या माध्यमातून शाळांमध्ये 3D प्रिंटर, सेन्सर्स, रोबोटिक्स किट आणि इलेक्ट्रॉनिक्सची***

***साधने उपलब्ध करून देण्यात आली. आतापर्यंत 10 हजार अटल टिंकरिंग लॅब स्थापन करण्यात आल्या असून, त्यापैकी जवळपास 60 टक्के सरकारी शाळांमध्ये आणि निम्म्याहून अधिक ग्रामीण भागात आहेत.याशिवाय, 72 अटल इनक्युबेशन केंद्रांच्या माध्यमातून स्टार्टअप्सना सुरुवातीच्या टप्प्यात आवश्यक मार्गदर्शन आणि मदत दिली जात आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने अटल इनोव्हेशन मिशनची विस्तारित कार्यकक्षेसह 2028 पर्यंत मुदतवाढ करण्यास मंजुरी दिली आहे. उद्योग सुरू झाल्यानंतर नव्हे, तर शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडवण्याची आणि नवोन्मेषाची मानसिकता विकसित करण्यावर या मिशनचा भर आहे.***

---------------------------------------

जीएसटी

57व्या GST परिषदेच्या बैठकीत करदात्यांना दिलासा देणारे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. GST अंतर्गत अटक करण्याचा अधिकार हटवण्याची शिफारस करण्यात आली असून, खटला चालवण्याची मर्यादा 1 कोटी रुपयांवरून 5 कोटी रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वसाधारण दंडाची रक्कम 25 हजारांवरून 10 हजार रुपये करण्यात येणार आहे. किमान शिक्षेची तरतूदही हटवण्यात येणार असून, दंड किंवा कारावास अथवा दोन्हींबाबतचा निर्णय न्यायालयाच्या विवेकाधिकारावर असेल.

---------------------------------------

हवाई दल-स्थापना दिन

भारतीय वायुसेनेचा 94 वा स्थापना दिवस आज साजरा होत आहे. यंदाच्या स्थापना दिनाची संकल्पना 'अभेद्य, अचूक आणि सटीक' अशी आहे. वायुसेना प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी, भारतीय वायुसेना राष्ट्राच्या संरक्षणासाठी सदैव सज्ज असल्याचं म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वायुसेना दिनानिमित्त वायुसेनेच्या शूर जवानांना शुभेच्छा देत त्यांच्या धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेला सलाम केला आहे.

---------------------------------------

चाळणी परीक्षा

'महाज्योती' आणि 'वनार्टी'च्या वतीने घेण्यात येत असलेल्या चाळणी परीक्षेत पुणे आणि नांदेड येथील काही परीक्षा केंद्रांवर तांत्रिक अडचणी आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात येणार असून, संबंधित केंद्रांचे अहवाल, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक नोंदी तपासण्यात येणार

आहेत. दरम्यान, तांत्रिक अडचणींमुळे परीक्षा देता न आलेल्या पात्र विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा 10 ऑक्टोबरला घेण्यात येणार आहे.

-------------------------------------

नाना पाटेकर-निधन

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं आज, सकाळी गोव्यातील डोना पावला येथील निवासस्थानी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झालं. ते 75 वर्षांचे होते. मराठी रंगभूमीपासून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या नाना पाटेकर यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. ऐकूया नाना पाटेकर यांच्या जीवनकार्याविषयी अधिक माहिती....

***(व्हॉइस कास्ट - धैर्यशील १ मिनिट ११ सेकंद)***

***नाना पाटेकर यांचं मूळ नाव विश्वनाथ पाटेकर. त्यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी कोकणात मुरुड इथं झाला होता. मुंबईतल्या जेजे स्कूल ऑफ आर्ट्सचे ते विद्यार्थी होते. नाना यांनी आपली अभिनय कारकीर्द मराठी रंगभूमीवरून सुरू केली. हमिदाबाईची कोठी या नाटकातून त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केलं. जयवंत दळवी यांच्या पुरुष या नाटकातला त्यांचा खलनायक गाजला. १९७८मध्ये आलेल्या गमन या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. अंकुश, प्रतिघात, सलाम बॉम्बे, थोडासा रूमानी हो जाए, प्रहार, राजू बन गया जेंटलमन, तिरंगा, क्रांतिवीर, यशवंत, अग्निसाक्षी, परिंदा, खामोशी, वेलकम, अबतक छप्पन अशा गाजलेल्या चित्रपटांमधून विविध रंगी भूमिका साकारत त्यांनी रसिकांच्या मनावर राज्य केलं. प्रहार या चित्रपटाचं दिग्दर्शनही नाना पाटेकर यांनी केलं होतं. सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता, मुख्य अभिनेता असे विविध श्रेणीतले फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाले. केंद्र सरकारने त्यांना २०१३मध्ये पद्मश्री देऊन गौरवलं होतं. महाराष्ट्रातल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी स्थापन झालेल्या नाम फाऊंडेशनचे ते संस्थापक सदस्य होते. १९९९मध्ये कारगिल युद्धाच्या काळात आपली अभिनय कारकीर्द काही काळासाठी बाजूला ठेवून ते दोन महिने सैनिकांसोबत राहिले होते.(आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी धैर्यशील मेश्राम)***

नाना पाटेकर यांच्या निधनाने चित्रपटसृष्टी आणि राजकीय क्षेत्रातून शोक व्यक्त करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाना पाटेकर यांच्यासारखी झोकून देण्याची वृत्ती, स्वतःचे वेगळेपण आणि प्रभाव फारच मोजक्या अभिनेत्यांमध्ये असल्याचं सांगत, त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, शरद पवार

यांच्यासह अनेक नेते आणि चित्रपटसृष्टीतील सहकाऱ्यांनीही नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाना पाटेकर यांच्या निधनाला धक्कादायक घटना म्हणत, नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी जपलेली सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनीही श्रद्धांजली अर्पण केली दरम्यान, नाना पाटेकर मे महिन्यात नागपुरात पूर्ती सिंचन संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित जलक्रांती परिषदेला उपस्थित राहिले होते. नाना पाटेकर यांच्यावर आज पुण्याजवळील डोणजे इथं सायंकाळी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

---------------------------------------

धडक मोर्चा

निवडणूक आयोगाच्या विशेष पुनरीक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जात असल्याचा आरोप करत इंडिया आघाडीच्या वतीनं आज नागपुरात जोरदार निदर्शने करण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात महात्मा गांधी पुतळा, व्हेरायटी चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत धडक मोर्चा काढण्यात आला.

---------------------------------------

मोटार सायकल मोर्चा

वाशिममध्ये महाविकास आघाडीच्या वतीने आज ‘मत वाचवा-देश वाचवा’ मोटरसायकल मोर्चा काढण्यात आला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात कारवाई आणि SIR रद्द करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते.

---------------------------------------

नोबेल पुरस्कार

कमेडियन लेखिका अ कार्सन यांना त्यांच्या धाडसी आणि नाविन्यपूर्ण साहित्यनिर्मितीसाठी यंदाचा साहित्याचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. शास्त्रीय साहित्यपरंपरेशी सर्जनशील संवाद साधत त्यांनी समकालीन साहित्यासाठी नवी रूपे निर्माण केली, यासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. 'ऑटोबायोग्राफी ऑफ

रेड', 'द ग्लास एसे', 'इरॉस द बिटरस्वीट' या त्यांच्या काही प्रसिद्ध साहित्यकृती आहे.

--------------------------------------

सामंजस्य करार

गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागातील माता, अर्भक आणि बालकांचे पोषण सुधारण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि व्हील्स ग्लोबल फाउंडेशन इंडिया यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.या करारानुसार पुढील तीन वर्षे 'मदर, इन्फंट अँड यंग चाइल्ड न्यूट्रिशन' अर्थात MIYCN प्रशिक्षण आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे.या अंतर्गत आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविकांना मातांचे पोषण, स्तनपान आणि पूरक आहाराबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

--------------------------------------